**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तानच्या कुरापती सुरूच, नागरी विमानांची ढाल करत ड्रोनच्या सहाय्यानं ३६ ठिकाणी हल्ल्याचा प्रयत्न, भारताकडून चोख प्रत्युत्तर
- ऑपरेशन सिंदूर’ला जागतिक समुदायाचा पाठिंबा
- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८८० अंकाची घसरण
- सीमाभागातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल क्रिकेट सामने आठवडाभरासाठी स्थगित
- महिला क्रिकेटमधे, तिरंगी एकदिवसीय मालिकेत कोलंबो इथं झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा श्रीलंकेवर ७६ धावांनी विजय

**आणि**

- खेलो इंडियाच्या पदकतालिकेत महाराष्ट्र अव्वल स्थानी कायम

**<><><><><><>**

पाकिस्तानच्या कुरापती सुरूच असून काल रात्री पुन्हा एकदा पश्चिमेकडच्या भारतीय हवाई हद्दीचं उल्लंघन करत घुसखोरी करत हल्ल्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या या कृतीला भारतानं चोख उत्तर दिल्याची माहिती आज नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली. पाकिस्ताननं नागरी विमानांचा ढालीसारखा वापर करत सुमारे ४०० ड्रोनच्या सहाय्यानं भारतात ३६ ठिकाणी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती सोफिया कुरेशी यांनी दिली. पाकिस्ताननं केलेल्या या कृतीला भारतानं चोख प्रत्युत्तर देत हवाई हल्ल्यांचा कट

उधळून लावला. पाकिस्ताननं पाठवलेले ड्रोन भारतानं चार ड्रोनच्या मदतीनं नष्ट केले.

ड्रोन हल्ल्यांबरोबरच नियंत्रण रेषेजवळ पाकिस्ताननं जोरदार गोळीबार सुरू केला. या गोळीबारात भारतीय लष्कराचे काही जवान जखमी झाले. भारतीय लष्करानं दिलेल्या सडेतोड प्रत्युत्तरात पाकिस्तानचं मोठं नुकसान झाल्याची माहिती व्योमिका सिंग यांनी दिली. कालचे हवाई हल्ले आपण केले नसून हा भारताचा कांगावा असल्याचा दावा पाकिस्ताननं केल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी दिली. काल जे काही घडलं त्याला भारतानं जबाबदारी सांभाळत चोख उत्तर दिलं असून या हल्ल्याची माहिती आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीत देणार असल्याचंही मिसरी यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

सर्व राज्यसरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांनी आणीबाणीच्या परिस्थितीत वापरण्याच्या अधिकारांचा वापर करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्या असं केंद्रीय गृहमंत्रालयानं सांगितलं आहे. नागरी संरक्षण नियमांनुसार राज्यसरकारांनी खबरदारीचे उपाय राबवावेत असं केंद्रीय गृहमंत्रालयानं सर्व राज्यसरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून….

# V/C

*(रुग्णालयं आणि वैद्यकीय आस्थापनांनी औषधं, रक्त, ऑक्सिजन आणि ट्रॉमा केअर कीट उपलब्ध करावं अशा सूचना देण्यात आल्या आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी याविषयी आज उच्चस्तरीय बैठक घेतली. वैद्यकीय आपत्ती निवारण यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश नड्डा यांनी या बैठकीत दिले. केंद्र*

*सरकारच्या रुग्णालयांनी राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, सशस्त्र दल, खासगी रुग्णालयं, डॉक्टर यांच्या समन्वय साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे. देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असून साठेबाजी करणाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल असा इशारा सरकारने दिला आहे. एटीएम, पैसे जमा करण्याची आणि काढण्याची यंत्रणा, डिजिटल व्यवहार प्रणाली सुरळीत सुरू असल्याचं सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी स्पष्ट केलं आहे. तसंच देशात पुरेशा प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असल्याचं इंडियन ऑईल कॉर्पोरेशननं म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमधे मॉक ड्रील करण्याचे तसंच जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातल्या सुरक्षा सज्जतेचा आढावा घेण्यासाठी मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. युद्ध स्थितीत बचावासाठी करण्याच्या विविध हालचालींची माहिती आणि प्रशिक्षण नागरिकांना, विशेषतः विद्यार्थ्यांना द्यावं, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ब्लॅकआऊटच्या वेळी विशेषतः रुग्णालयांबरोबर समन्वय यंत्रणा उभी करावी, मुंबई महानगरविकास क्षेत्रातल्या सर्व महानगरपालिकांना देखील या जनजागृतीत सहभागी करुन घ्यावं, पोलिसांनी अधिक सतर्क राहून गस्त आणि बंदोबस्त वाढवावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, वृत्तवाहिन्या, डिजिटल मंच आणि वार्ताहरांनी भारतीय सशस्त्र दलांच्या हालचाली आणि कारवायांचं थेट प्रक्षेपण करू नये, अशी सूचना संरक्षण मंत्रालयानं आज केली. अशी संवेदनशील आणि गोपनीय माहिती प्रसारित केल्यामुळे सशस्त्र दलांच्या कामात अडथळा येऊन नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'ला जागतिक समुदायानं पूर्ण पाठिंबा दिला आहे. अमेरिका, यूके, इस्त्रायल, सौदी अरेबिया, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींनी भारताच्या भूमिकेचं समर्थन केलं आहे. युरोपीय संघ आणि सर्व २७ सदस्य देशांनी यासंदर्भात एक संयुक्त निवेदन जारी केलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचं समर्थन करताना, संयम ठेवायची आणि चर्चेतून मार्ग काढायची सूचना केली आहे. रशियानंही संयम बाळगण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तानधल्या तणावपूर्ण वातावरणाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ८८० अंकाची घसरण झाली, आणि तो ७९ हजार ४५४ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २६६ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ८ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तान दरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयपीएलचे आजपासून पुढचे सर्व सामने आठवडाभरासाठी स्थगित केले आहेत. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन संबंधितांशी चर्चा करून स्पर्धेचं पुढचं वेळापत्रक जाहीर केलं जाईल, असं बीसीसीआयनं स्पष्ट केलं.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे तिरंगी एकदिवसीय मालिकेत, आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं श्रीलंकेवर ७६ धावांनी विजय मिळवला.

दक्षिण अफ्रिकेनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ९ बाद ३१५ धावा केल्या. ॲनेरी डेर्क्सननं १०४, तर क्लोई ट्रायॉननं ७४ धावा केल्या.

श्रीलंकेतर्फे देवमी विहंगानं ५ बळी घेतले. विजयासाठी ३१६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव ४३ व्या षटकातच २३९ धावांवर आटोपला. चामरी अटापट्टुच्या ५१ आणि अनुष्का संजीवनीच्या नाबाद ४३ धावा वगळता श्रीलंकेच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. दक्षिण अफ्रिकेतर्फे क्लोई ट्रायॉननं ५ बळी घेतले. ती या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं आतापर्यंत २४ सुवर्ण, २१ रौप्य, आणि २० कांस्य अशी ६५ पदकं पटकावत पदकतालिकेत अव्वल स्थान कायम राखलं आहे. कर्नाटक ३८ पदकं मिळवून दुसऱ्या स्थानावर, तर तामिळनाडू आणि हरियाणा प्रत्येकी २३ पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर आहेत. नेमबाजी स्पर्धेत, महाराष्ट्राच्या पार्थ माने आणि शांभवी क्षीरसागर यांनी १० मीटर एअर रायफल युवा गटाच्या मिश्र संघामध्ये सुवर्णपदक पटकावलं. या नेमबाजी स्पर्धेत शांभवीचं हे दुसरं सुवर्णपदक आहे. खो-खो मध्ये महाराष्ट्रानं सलग ७ व्यांदा सुवर्ण पदक पटकावलं, तर मुलींच्या संघाला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><><>**

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याला आज विशेष एनआयए न्यायालयानं ६ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली. २८ एप्रिल रोजी १८ दिवसांचा रिमांड संपल्यानंतर राणाला एनआयए कोठडी वाढवण्यासाठी न्यायालयात हजर करण्यात आलं.

**<><><><><><>**

पाकिस्तानच्या कुरापती भारतानं रोखल्यामुळे पाकिस्तान डिजिटल माध्यमांवर अफवा आणि चुकीची माहिती पसरवत आहे. समाजमाध्यमावर बनावट प्रतिमा, चित्रफिती प्रसृत करत पाकिस्तान माध्यमांची आणि लोकांची दिशाभूल

करत आहे. यासाठी व्हिडीओ गेमचे व्हिडीओ तसंच जुने व्हिडीओ समाजमाध्यमावर टाकून पाकिस्तान चुकीची माहिती पसरवत आहे. अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास तात्काळ पत्र सूचना कार्यालयाला याची माहिती द्यावी, ८७९९७११२५९ या व्हॉट्सअप क्रमाकांवर किंवा socialmedia@pib.gov.in या मेलवर असा मजकूर पाठवावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार दुपारी ३चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, संध्याकाळी पाच वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र ५ वाजून २० मिनिटांनी तर रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल. आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

**//<><><><><><>//**